
# दुर्दम्य आशावादी : डॉ. रघुनाथ माशेलकर

**लेखक : डॉ. सागर देशपांडे / सह्याद्री प्रकाशन / पृष्ठसंख्या – ५७८ / किंमत ₹ ९९९**

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात नवरत्नांची मांदियाळी व्यासपीठावर पाहण्याचे भाग्य मिळणे हे आम्हा शास्त्राच्या विद्यार्थ्यांना एक वेगळीच अनुभूती देऊन गेली.




गोव्यातील माशेल या गावात एका सामान्य घरात डॉक्टरांचा जन्म झाला, पितृसुख हिरावून गेलेला हा लहान जीव मुंबईत त्याच्या आईबरोबर आला. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत रस्त्यावरील दिव्यांखाली बसून अभ्यास केला, अत्यंत परिश्रमपूर्वक आणि चिकाटीने नुसतेच शिकला असे नाही तर अकरावीच्या परीक्षेत बोर्डात अकरावा आला, यामुळे त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सोपा झाला. वाचनाची आवड, लेखन आणि उत्कृष्ट वक्तृत्व ही त्यांची शालेय जीवनात रुजलेली बीजे पुढे अनेक प्रकारे सर्वांना प्रत्ययास आली ती त्यांच्या लेखनातून, संशोधनातून आणि व्यवस्थापन कौशल्यातून. या सर्व काळात त्यांच्या मातोश्रींनी अत्यंत परिश्रम करून त्यांच्या आयुष्यात जीवनमूल्ये रुजविली. हा प्रवास अखंड सुरु होता, तो त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांच्या प्रेरणेने.

डॉ. शर्मा यांच्या सारखे गुरुतुल्य व्यक्तीमत्व डॉक्टरेट साठी मार्गदर्शक म्हणून त्यांच्या आयुष्यात आले, परंतु पदवी पूर्ण झाल्यावरही हे गुरुशिष्याचे नाते त्यांनी अखंड जपले. अनेक मानसन्मान वाट्याला आले तरीही डॉ. माशेलकर हे जगन्मित्रच राहिले. भारतात होणारे संशोधन हे सर्वसामान्याच्या उपयोगी पडणारे असावे हा मूलमंत्र त्यांनी जेथे जेथे संशोधन केले तेथे तेथे रुजविला.

एकविसाव्या शतकात भारत हा जागतिक पातळीवर उत्तम दर्जाचा ज्ञानाधिष्टीतसमाज झाला पाहिजे यासाठी ज्ञानाची आस हवी, शिक्षण ही त्याची गुरुकिल्ली होय, यासाठी शिक्षण पद्धतीत आमुलाग्र बदल हवेत, ज्ञान आणि सर्जनशीलता वाढविणारे शिक्षण हवे असे त्यांनी अनेक वेळा प्रतिपादित केले. उद्योग क्षेत्राने केवळ विकासाचे साधन म्हणून बाजारपेठेकडे न बघता तंत्रज्ञान हे विकासाकडे जाण्याचे साधन म्हणून बघायला हवे असे आग्रहापूर्ण प्रतिपादन डॉ. माशेलकर यांनी केले. समाजाच्या तळागाळातील संशोधकांना शोधून त्यांना मदत करायला हवी, असे प्रयत्न केल्यास रोजगार निर्माण करणारा विकास असे विकासाचे नवे प्रारूप त्यांनी मांडले.

डॉ. माशेलकरांची पेटंटची लढाई तर सर्वज्ञातच आहे. भारताच्या प्राचीन वाङ्मयातील संदर्भ शोधून हे ज्ञान मुळात भारतीय समाजाचे आहे हे आंतरराष्ट्रीय पातळीवर सिद्ध करण्याचे महत्वाचे योगदान त्यांनी दिले. बासमती तांदूळ असो किंवा हळदीवरील पेटंट असो, ही बौद्धिक संपदा भारताची आहे त्याच बरोबर आयुर्वेद आणि योग याविषयी जागृती निर्माण करण्याचे

महत्वाचे कार्य त्यांनी पार पाडले.

जर पुनर्जन्म असेल तर तो मला भारतातच मिळावा तसेच ह्या जन्मातील सर्व आप्तांची साथ अशीच मिळावी असे प्रतिपादन त्यांनी केले त्यावरून त्यांच्या देशासंबंधी तळमळीची कल्पना येते.

इतक्या महान कर्तृत्ववान व्यक्तीचे चरित्र लिहिणे हे आव्हान डॉ. सागर देशपांडे यांनी सहज पेलले. अत्यंत परिश्रम पूर्वक बारीक सारीक तपशील संगतवार मांडणे, अभ्यासपूर्ण लेखन करताना त्यात सुसंगती राखणे ही लेखकाची किमया पाहून त्यामागील घेतलेली मेहनत लक्षात येते. डॉ. माशेलकर यांच्यासारख्या शास्त्रज्ञ व्यक्तीचे चरित्रलेखन करणे सोपे नक्कीच नाही, तरीही पूर्णांशाने प्रत्येक बारीक सारीक पण महत्वाच्या गोष्टी लेखनात समाविष्ट झाल्याने हे चरित्र एक संदर्भ ग्रंथ म्हणून वाचल्या जाईल यात तिळमात्र शंका नाही.

सुमारे ८० वर्षांच्या इतिहासाची पाने उलगडताना त्यातील काळानुरूप केलेली अनेक वर्णने केवळ अप्रतिम. या अत्युच्च व्यक्तिमत्त्वाचे विशेष सोप्या भाषेत मांडण्याची कला पुस्तक वाचनात वेळोवेळी प्रत्ययास येते. अतिशय साधेपण, मृदू स्वभाव, आपली दुर्दम्य इच्छाशक्ती, संशोधनात्मक कार्य आणि त्याचबरोबर समाजातील विविध घटकांशी आलेल्या संबंधातून दिसून येणारी इतरांबाबतची आत्मीयता, मैत्री, या आणि अशा अनेक बाबींचे उल्लेख त्यांचे निराळेपण अधोरेखित करते.

पान ५४५ ते ५७३ यामध्ये सरांच्या कर्तृत्वाचा आलेख लक्ष वेधून घेतो आणि सचोटी आणि सत्कर्माचे हे मिळालेले वरदान त्यांच्या पदरी पडले ही ईश्वरी कृपाच.

एक ज्ञानपीठ हा शब्द कमी पडावा अशा एका व्यक्तीचे हे चरित्र नक्कीच सगळ्यांना मार्गदर्शक ठरेल यात तिळमात्र शंका नाही.

◆

**रविंद्र अनंत साठे**
भ्रमणध्वनी : ०९४०५९६३९५१




दुर्दम्य आशावादी – डॉ. रघुनाथ माशेलकर या ज्येष्ठ पत्रकार डॉ.सागर देशपांडे लिखित चरित्रग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे क्षणचित्र